# आसमंतात कोरडे

आता फिरते आभाळ
काळ्या भुईची तहान
आक्रंदते रानोमाळ
झाडे आशेने बघती
कधी येईल पाऊस
बांधावर शेवरीचा
जीव झाला कासावीस
झाडे आंब्याची जळाली
आजोबांनी लावलेली
जीव तिळतिळ तुटे
माय कितीदा रडली
चोपणाच्या रानामंदी
विंचू किरडांचा वास
रानामध्ये, मनामध्ये
घडे रोज उपवास

**– प्रकाश रामचंद्र क्षीरसागर**

---------------------